
कीडनियंत्रण


# ऊसातील पायरिला किडीचे व्यवस्थापन



**डॉ. मंगेश बडगुजर**
(मो.नं. ९४२२७७११२६)
सहाय्यक कीटकशास्त्रज्ञ
**डॉ. राकेश सोनवणे**
कांदा व द्राक्ष संशोधन केंद्र,
पिंपळगाव (ब), ता. निफाड, जि. नाशिक







> पायरिला या किडीची अंडी ही समूहामध्ये व पिंजलेल्या कापसासारख्या पदार्थाने झाकलेली असतात. ही अंडी हिरव्या पानांच्या खालच्या बाजूस मुख्य शिरेजवळ अथवा ऊसावरील खालील वाळलेल्या पानांवर आढळून येतात. अंड्यांचा रंग पांढरा ते हिरवट पिवळा असतो.

सध्याच्या बदलत्या वातावरणामध्ये किडींचा उद्रेक ही नित्याची बाब झालेली आहे. सध्या गोदावरी नदीकाठच्या कार्यक्षेत्रात पायरिला म्हणजेच पाकोळी या किडीचा उद्रेक फार मोठ्या प्रमाणात झालेला आढळून येत आहे.

**ओळख :** पाठीमागे चिमट्यासारख्या दोन शेपट्या असणारी पिल्ले तसेच तपकिरी रंगाच्या प्रौढावस्था पानावर दिसतात. या किडीच्या प्रादुर्भावामुळे पाने पिवळी पडतात. प्रादुर्भाव जास्त असल्यास पानावर काळी बुरशी वाढते. ऊसाच्या वजनात व साखर उताऱ्यात घट येते.

या किडीची अंडी ही समूहामध्ये व पिंजलेल्या कापसासारख्या पदार्थाने झाकलेली असतात. ही अंडी हिरव्या पानांच्या खालच्या बाजूस मुख्य शिरेजवळ अथवा ऊसावरील खालील वाळलेल्या पानांवर आढळून येतात. अंड्यांचा रंग पांढरा ते हिरवट पिवळा असतो. अंड्यातून निघणारी नवीन पिल्ले पांढरी शुभ्र, कोमल व लाल डोळ्यांची असतात. त्यांच्या शरीराच्या मागील भागावर दुधाळ पांढरे, झुपकेदार दोन लांबट अवयव असतात. प्रौढ कीटक फिक्कट तपकिरी रंगाचे, पाचरीच्या आकाराचे, कोमल व अतिशय चपळ असतात. या प्रौढ कीटकांचा पुढील भाग टोकदार तर मागील भाग रूंद असतो. प्रौढ व पिल्लांना विचलित केल्यावर ते तिरकस चालतात.

**जीवनक्रम :** प्रौढ मादी खालील पानांवर, सावलीच्या ठिकाणी सुरक्षित जागी अंडी देण्यास प्राधान्य देते. एक मादी आपल्या जीवन कालावधीमध्ये ३० ते ५० अंड्यांच्या समूहात ६०० ते ८०० अंडी देते. अंड्यातून ६ ते १० दिवसांत पिल्ले बाहेर पडतात. पिल्ले ३४ ते ४० दिवसांत चार वेळा कात टाकून प्रौढ होतात. या कीटकामध्ये अपूर्ण रूपांतरण असते. संपूर्ण जीवनक्रम ४५ ते १०५ दिवसांत पूर्ण होतो. एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत ही कीड जास्त सक्रिय असते व या कालावधीत ४ ते ५ पिढ्या पूर्ण होतात. हिवाळ्यात पिल्ले सुप्तावस्थेमध्ये असतात.


**नुकसान :** या किडीची पिल्ले व प्रौढ पानातील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात. ही कीड आपल्या शरीरातून पानावर चिकट द्रव सोडते. त्यामुळे त्यावर काळी बुरशी वाढते. परिणामी पानांची प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते व परिणामी ऊसाची वाढ कमी होते. या किडीच्या प्रादुर्भावामुळे ऊसाच्या उत्पादनात २८ ते ५० टक्के, साखर उत्पादनात २ ते ५ टक्के तर गूळ उत्पादनात २.२ ते ३ टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते.

**कीड व्यवस्थापन :** १. ऑगस्ट महिन्यानंतर ऊसाची खालची वाळलेली पाने काढावीत. २. ऊसाच्या खालील पानांवरील पाकोळीची अंडी गोळा करुन त्यांचा नाश करावा. ३. या किडीचे जैविक नियंत्रण करण्यासाठी 'इपिरिकेनिया मेल्यॅनोल्युका' या मित्रकीटकाचे ५ हजार कोष अथवा ५ लक्ष अंडी प्रतिहेक्टरी सोडावीत. अशा शेतामध्ये रासायनिक औषधांची फवारणी करू नये. त्याचप्रमाणे ऊस तुटल्यानंतर पाचट जाळू नये. ४. आवश्यकता वाटल्यास शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने दाणेदार कीटकनाशके जमिनीतून द्यावीत. ५. या किडीच्या नियंत्रणासाठी रासायनिक औषधांची फवारणी टाळावी.


(आवश्यकता वाटल्यास शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने क्लोरपायरिफॉस २०% ई.सी. १.५ ते २ मि.लि. अथवा मोनोक्रोटोफॉस ३६% प्रवाही १ मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.) अशा पद्धतीने ऊसावरील पायरिला किडींचे व्यवस्थापन करता येते.




**पायरिला (पाकोळी) या किडीची कापसाच्या पुंजक्याखाली असलेली अंडी**



**पायरिला (पाकोळी) या किडीची पिल्ले**



पायरिला (पाकोळी) या किडीचे प्रौढ कीटक




पायरिला (पाकोळी) या किडीची पिल्ले व प्रौढ कीटक



पायरिला (पाकोळी) या किडीने ऊसाच्या पानातील रस शोषल्यामुळे पाने अशा प्रकारे पिवळी पडतात.



पायरिला (पाकोळी) या किडीने ऊसाच्या पानांतील रस शोषल्यामुळे नुकसान झालेला ऊस



इपिरीकेनिया मेल्यॅनोल्युका या मित्रकीटकाचे कोष व अंडी



इपिरिकेनिया मेल्यॅनोल्युका या मित्रकीटकाची अंडी (CLOSE UP PHOTO)



पायरिलाच्या पिल्लांवर आलेला इपिरिकेनिया मेल्यॅनोल्युका हा मित्रकीटक



पायरिलाच्या किडीवर (प्रौढ) आलेला इपिरिकेनिया मेल्यॅनोल्युका हा मित्रकीटक



पायरिला (पाकोळी) या किडीची कापसाच्या पुंजक्याखाली असलेली अंडी



पायरिला या किडीच्या अंड्यांवर आलेला टेट्रॅस्टिकस पायरिले हा परोपजिवी कीटक